नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २८५ | Issue - 285 | वार शनिवार दि. ७ मार्च २०२६ | Blow- Saturday Date 7 March 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# शेतकऱ्यांना कर्जमाफीची योजना जाहीर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुती सरकार सत्तेत आल्यापासून कर्जमाफीच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याचे नवनिर्वाचित अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडताना कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा केली. आम्ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना राबवण्याचं आश्वासन दिलं होतं. त्यासाठी समिती गठीत केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी आज जाहीर करत आहे, अशी घोषणा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन पर लाभ दिला जाणार असल्याचेही फडणवीस यांनी जाहीर केले.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबत राज्यातील बँकिंग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात येईल. शेतकरी वारंवार कर्जबाजारी न होता त्याला कायमचा कर्जमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प असून समितीच्या शिफारसीनुसार दीर्घकालीन उपाययोजन केल्या जात आहेत, असेही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महायुती सरकार सत्तेत आल्यापासून विरोधकांकडून महायुती सरकारला शेतकरी कर्जमाफीच्या योजनेचे काय झाले, असा जाब विचारत होते. निवडणूक झाल्यानंतर सरकार शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन विसरले, अशी टीका विरोधकांकडून केली जात होती. मात्र, आज देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करुन विरोधकांच्या या टीकेतील हवा काढून घेतली आहे. मात्र, ही कर्जमाफी नेमकी कोणाला मिळणार, याचे निकष आणि तपशील अद्याप समोर येणे बाकी आहे.

शेतकऱ्यांसाठी दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर

– दोन लाख रुपयांपर्यंतची थकबाकी असलेले शेतकरी.

– ज्यांचं पीककर्ज थकलेलं आहे असे शेतकरीच पात्र असतील.

– ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्ज माफ होणार.

– नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ.

गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूर यांचा हा सहभाग करणार

पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे

३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे

चारही कृषि विद्यापीठात एआयजी मदत घेतली जात आहे

शेतकर्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे

ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे

१ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारीपर्यंत झाले आहे

चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील

आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात

गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचा ही समावेश करणार

महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल.

लाडकी बहीण योजनेबाबत अर्थसंकल्पात मोठी घोषणा

देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात लाडकी बहीण योजना (डरवज्ञळ इरहळप धेक्षरपर) पुढील आर्थिक वर्षातही सुरुच राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावर विरोधकांनी लगेच महायुती सरकारने लाडक्या बहिणींचे अनुदान १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्याच्या दिलेल्या आश्वासनाबद्दल विचारले. यावर देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, काळजी करु नका तुमच्या मनातील गोष्टी आम्हीच पूर्ण करणार. वेळ आल्यावर आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, फक्त कोर्टात जाऊ नका, अशी टिप्पणी देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात सध्याच्या घडीला ३७ लाख लखपती दीदी आहेत. आणखी २५ लाख बहिणींना लखपती करण्याचे आमचे उद्दिष्ट असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव, कर्नाटक सरकारचा मोठा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरु:कर्नाटकसरकारच्यावतीनं १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरास मनाई करणारा प्रस्ताव मांडण्यात आला. लहान मुलांच्या मोबाईलच्या अतिरिक्त वापराचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. लहान मुलं डिजीटलच्या आहारी जाऊ नये म्हणून अशा प्रकारची बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे पहिलं राज्य बनलं आहे. कर्नाटककडून ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईमपासून मुलांना वाचवण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय घेतला जात आहे.



कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दारामय्या यांनी १७ व्या वेळी अर्थसंकल्प सादर करताना लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर म्हणजेच १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला. सिद्दारामय्या यांनी कर्नाटकचा ४,४८,००४ कोटींचा कर्नाटकचा अर्थसंकल्प मांडला.

मोबाईलच्या वाढत्या वापरापासून होणाऱ्या दुष्परिणामापासून लहान मुलांचं संरक्षण करण्यासाठी १६ वर्षाच्या खालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला गेला. मोबाईल फोनच्या वाढत्या वापराचा नकारात्मक परिणाम मुलांवर होऊ नये म्हणून बंदी घालण्याचा प्रस्ताव आणला केला.

कर्नाटक विधिमंडळाच्या मागील अधिवेशनात राज्याचे आयटी मंत्री प्रियांक खरगे यांनी राज्य सरकार लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्यासंदर्भातील शक्यता तपासून पाहत असल्याचं म्हटलं होतं.

दरम्यान, ऑस्ट्रेलियानं त्यांच्या देशात १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली आहे.भारतातील विविध राज्य देखील लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा विचार करत आहेत. लहान मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेसाठी आणि स्क्रीन टाईम कमी व्हावा म्हणून अशा प्रकारची पावलं उचलली जात आहेत.

भारतात आंध्र प्रदेश सरकार आणि गोवा सरकार देखील लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा विचार करत आहेत. डिजिटल व्यसन, सायबर हल्ले आणि ऑनलाईन सुरक्षेला धोके अशी कारणं यासाठी दिली जात आहेत.

## अमेरिकेची रशियन तेल घेण्यास ३० दिवसांची परवानगी; राहुल गांधींची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणांवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधताना राहुल गांधी म्हणाले की, परराष्ट्र धोरणाची सध्याची स्थिती एका तडजोड करणाऱ्या व्यक्तीच्या शोषणाचा परिणाम आहे. त्यांनी पश्चिम आशियातील युद्ध आणि अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराबद्दल ही टिप्पणी केली. राहुल गांधी यांनी संसदेत ११ फेब्रुवारी रोजी केलेल्या भाषणाचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत त्यांनी तेल खरेदीवरून अमेरिकेकडून सुरु असलेल्या मुस्कटदाबीवर जोरदार हल्ला चढवला होता.

राहुल गांधी यांनी द वर म्हटलं आहे की, भारताचे परराष्ट्र धोरण आपल्या लोकांच्या सामूहिक इच्छेने आकारले जाते. ते आपल्या इतिहासात, आपल्या भूगोलात आणि सत्य आणि अहिंसेवर आधारित आपल्या आध्यात्मिक नीतिमत्तेत रुजले पाहिजे. त्यांनी आरोप केला, आज आपण जे पाहत आहोत ते धोरण नाही. ते तडजोड करणाऱ्या व्यक्तीच्या शोषणाचे परिणाम आहे.



११ फेब्रुवारी रोजी राहुल यांनी आता अमेरिका ठरवणार की आम्ही कोणाकडून तेल खरेदी करतो. अमेरिका आमच्याकडे येईल आणि म्हणेल की तुम्ही यांच्याकडून, त्यांच्याकडून किंवा आणि कोणाकडून तेल खरेदी करू शकत नाही. रशिया, इराण, त्यांना कोणाकडून हवे ते ठरवतील. आमचे पंतप्रधान निर्णय घेणार नाहीत. ते निरीक्षण करतील. ते लक्ष ठेवतील, म्हणजे ते पाहतील आणि जर भारत त्यांना नको असलेल्या कोणाकडून तेल खरेदी करेल तर ते आम्हाला शिक्षा करतील. दरम्यान, एक दिवस आधी, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षादरम्यान भारताला आलेल्या अडचणींवरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला होता.

राहुल गांधींनी सोशल मीडिया द वर पोस्ट केले, जग एका अस्थिर टप्प्यात प्रवेश करत आहे. एक भयानक संकट पुढे येत आहे. भारताचा तेल पुरवठा धोक्यात आहे, कारण आपल्या आयातीपैकी ४० टक्क्यांहून अधिक भाग होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जातो. एलपीजी आणि एलएनजीसाठी परिस्थिती आणखी वाईट आहे.' राहुल गांधींनी लिहिले की, 'संघर्ष आपल्या शेजारी पोहेचला आहे; हिंदी महासागरात एक इराणी युद्धनौका बुडाली आहे. तरी-ही पंतप्रधानांनी यावर भाष्य केलेले नाही. अशा वेळी आपल्याला स्थिर नेतृत्वाची आवश्यकता आहे. उलट, भारताकडे असे पंतप्रधान आहेत जे तडजोड करत आहेत आणि त्यांनी धोरणात्मक स्वायत्तता सोडली आहे.'

## महाराष्ट्र तापला! मार्चच्या पहिल्या आठवड्यातच तापमानाच्या पाऱ्यानं गाठला उच्चांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवसेंदिवस राज्यात उन्हाचा चटका वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा लोकांना मोठा त्रास होत आहे. राज्याच्या विविध भागात तापमानाचा पारा ३५ अंशाच्या पुढे गेल्याचं पाहायला मिळत आहे. तर काही ठिकाणी तापमानाचा पारा ४० अंशावर गेल्याचं दिसत आहे. आज अकोल्यात मार्चच्या पहिल्याच आठवड्यात तापमानाने उच्चांक गाठला आहे. तापमानाचा पारा ४०.७ अंशावर गेला आहे.

विदर्भात उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दिसत असून अकोला शहरात मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात तापमानाने उच्चांक गाठला आहे. आज, ६ मार्च रोजी अकोल्यातील कमाल तापमान तब्बल ४०.७ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले आहे. त्यामुळं अकोलेकरांना मार्चच्या सुरुवातीलाच कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळं दुपारच्या सुमारास रस्त्यांवरची वर्दळ कमी झालेली दिसून येत असून उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

**सोलापुरात देखील उन्हाचा चटका वाढला, तापमानाचा पारा ३९.५ अंशावर**



सोलापुरात देखील उन्हाचा चटका वाढला आहे. सोलापुरात आज तब्बल ३९.५ अंश से तापमानाची नोंद झाली आहे. मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात सोलापुराचा पारा ४० अंश से दिशेने गेला आहे. मागील तीन दिवसापासून उन्हाचा पारा सलग ३८ अंश से च्या पार आहे.

राज्यात तापमानाचा पारा वाढल्यानं नागरिकांना त्रास

राज्यात उन्हाचा चटका वाढत आहे. तापमानात वाढ झाल्याने दुपारी उकाडाही जाणवत आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान होते. तर राज्यातील उन्हाचा चटका वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. त्यानुसार तापमानात वाढ होत असल्याचं चित्र दिसत आहे. कोकणातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामान होते. उद्याही पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज देण्यात आला आहे. तापमानात वाढ झाल्याने राज्यातील बहुतांशी भागात उन्हाचा चटकाही वाढत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तसेच उत्तर महाराष्ट्रातील तापमानात मागील काही दिवसांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सलग दोन दिवस कमाल तापमान ३५ पार पुण्यात झाले. गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरात तापमान वाढीमुळे उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. मार्चच्या सुरुवातीलाच सलग दोन दिवस कमाल तापमानाने ३५ शी ओलांडली असून पुढील काही दिवसात तापमान आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**कोणत्या तारखेपर्यंत कर्जमाफी पूर्ण होईल? ठाकरेंचा सवाल**

**उद्धव ठाकरेंची अर्थसंकल्पावर टीका**

# विकासाचं मृगजळ दाखवणारा, कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया दिली. विकासाचं मृगजळ दाखवणारा हा अर्थसंकल्प आहे. प्रत्येकाला आता काही दिवसांनी कळेल की, या अर्थसंकल्पाने त्याच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे. मला असं वाटतं, एकतर राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे सर्वजण जाणतात. कर्ज काढून फटाके वाजवणारा हा अर्थसंकल्प आहे. त्यातून मला नाही वाटत राज्याचं काही हीत साधलं जाईल, अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

आताचे मुख्यमंत्री म्हणताय की, आम्ही शेतकऱ्यांचा सात-बारा करु कोरा. कोरा तर केलेला नाही. पण साधारणत: पाच वर्षांपूर्वी आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांची २ लाखांपर्यंतची कर्जमुक्ती केली होती. ही कर्जमाफी कालबद्ध पद्धतीने केल्यानंतर पात्र आणि अपात्र हे असं नियमांचं किंवा अटीतटी ठेवल्या नव्हत्या. फक्त दोन वेळेला शेतकरी त्या केंद्रावर गेल्यानंतर आम्ही शेतकऱ्याची सरसकट कर्जमुक्ती केली होती. दुर्दैवाने त्यानंतर कोरोना आला. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर राशी देण्यास सुरुवात केली तेव्हा आमचे सरकार पाडले, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

'शेतकरी अन् कामगारांसाठी फसवा अर्थसंकल्प'

एकूण अर्थसंकल्प पाहिला तर सात-बारा कोरा झालेला नाहीच. लाडक्या बहिणींचे जे भरीव २१०० रुपये दर महिना आर्थिक मदत देणार होते त्याचा कुठेही उल्लेख नाही. कंत्राटदारांसाठी मात्र ठोस योजना आहेत. प्रत्येक ठिकाणी कुठून कुठे मार्ग होणार आहे, कंत्राटदारांसाठी हा ठोस योजना आहेत. पण शेतकरी आणि कामगारांसाठी हा फसवा अर्थसंकल्प आहे, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

कोणत्या तारखेपर्यंत कर्जमाफी पूर्ण होईल? ठाकरेंचा सवाल

शेतकऱ्यांचं खरंच भलं करायचं असेल तर पात्र, अपात्र हा जो काही शाब्दिक खेळ केलेला आहे, तसा न



करता, ज्याप्रमाणे आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्याला २ लाखांपर्यंत कर्जमुक्त केलं होतं, तसे त्यांनी किती तारखेपर्यंत २ सप्टेंबर म्हटलं आहे, पण आमच्या सरकार येण्याआधीची जी योजना त्यांनी जाहीर केली होती ती अजून सुरु आहे. अर्थसंकल्पात वारंवार २०४७ चा उल्लेख झाला. आताची कर्जमाफी २०४७ पर्यंत तरी पूर्ण करणार का? हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दांत सांगावं. कर्जमाफी कोणत्या तारखेपर्यंत पूर्ण करु ते मुख्यमंत्र्यांनी सांगावं, असं उद्धव ठाकरेंनी आवाहन केलं.

'अर्थसंकल्पात ठोस असं काहीच नाही'

या अर्थसंकल्पात थापांची लेव्हल वाढली आहे. थापांचे उन्नत महामार्ग झाले आहेत. २०४७ कुणी बघितला आहे. अहो, आता शेतकरी, मध्यमवर्गीय, नोकरदार, नवे तरुण-तरुणी नोकरीच्या शोधात जाणार आहेत त्यांना काय मिळणार आहे, योजना जाहीर केल्या आहेत त्या योजनांचा पाठपुरावा कधी करणार, त्या योजना पूर्ण कशा होणार? जाहीर केलेल्या योजनांसाठी निधी कुठून आणणार? या अर्थसंकल्पात ठोस असं काहीच नाही, अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

संपादकीय....

## योग्य निर्णय

कर्नाटक सरकारच्यावतीनं १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरास मनाई करणारा प्रस्ताव मांडण्यात आला. लहान मुलांच्या मोबाईलच्या अतिरिक्त वापराचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. लहान मुलं डिजीटलच्या आहारी जाऊ नये म्हणून अशा प्रकारची बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे पहिलं राज्य बनलं आहे. कर्नाटककडून ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईमपासून मुलांना वाचवण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय घेतला जात आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दारामय्या यांनी १७ व्या वेळी अर्थसकंल्प सादर करताना लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर म्हणजेच १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला. सिद्दारामय्या यांनी कर्नाटकचा ४,४८,००४ कोटींचा कर्नाटकचा अर्थसंकल्प मांडला. मोबाईलच्या वाढत्या वापरापासून होणाऱ्या दुष्परिणामापासून लहान मुलांचं संरक्षण करण्यासाठी १६ वर्षाच्या खालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला गेला. मोबाईल फोनच्या वाढत्या वापराचा नकारात्मक परिणाम मुलांवर होऊ नये म्हणून बंदी घालण्याचा प्रस्ताव आणला केला. कर्नाटक विधिमंडळाच्या मागील अधिवेशनात राज्याचे आयटी मंत्री प्रियांक खरगे यांनी राज्य सरकार लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्यासंदर्भातील शक्यता तपासून पाहत असल्याचं म्हटलं होतं. दरम्यान, ऑस्ट्रेलियानं त्यांच्या देशात १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली आहे.भारतातील विविध राज्य देखील लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा विचार करत आहेत. लहान मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेसाठी आणि स्क्रीन टाईम कमी व्हावा म्हणून अशा प्रकारची पावलं उचलली जात आहेत. भारतात आंध्र प्रदेश सरकार आणि गोवा सरकार देखील लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा विचार करत आहेत. डिजीटल व्यसन, सायबर हल्ले आणि ऑनलाईन सुरक्षेला धोके अशी कारणं यासाठी दिली जात आहेत.

## शेतकऱ्यांसाठी केलेली कर्जमाफी तकलादू; मुख्यमंत्र्यांच्या कर्जमाफीच्या घोषणेवर राजू शेट्टींचा हल्लाबोल

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली असून दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा करण्यात आली आहे. राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' अंतर्गत ही कर्जमाफी लागू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणाही सरकारकडून करण्यात आली आहे. दरम्यान, या घोषणेवरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी आणि किसान सभेचे राज्य सरचिटणीस अजित नवले यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी केलेली कर्जमाफी ही तकलादू आहे.

# विकसित महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : २०२६

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

– एकूण चार स्तंभांवर आधारित अर्थसंकल्प: प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन

– प्रत्येक स्तंभात ४ उपक्षेत्र. अशा १६ उपक्षेत्रांवर आधारित हा अर्थसंकल्प

शेती

– राज्यातील शेतकर्यांना कर्जमाफी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर.

३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकर्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्ज परतफेड करणार्या पात्र शेतकर्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकर्यांना कायम स्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करणार

– जून ते ऑक्टोबर २०२५ : शेतकर्यांना १५,४९२ कोटी रुपये वितरित

– शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार

– ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी, को. ऑप स्टॅक इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम उभारणार

– शेतीत एआयचा वापर. महाविस्तार एआय, वसुधा व्हॉईस टेलिफोनी, पुश टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज, एआय सक्षम सँडबॉक्स इत्यादी उपक्रम सुरु

– आता ४ कृषी विद्यापीठे एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स इनोव्हेशन अँड इन्क्युबेटर सेंटरची स्थापना करणार. उत्पादन खर्चात २५ टक्के घट होऊन उत्पादकता वाढीला चालना

– जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार

– कृषी समृद्धी योजना : २०२६-२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवणार.

– नवीन प्राकृतिक शेती अभियान: ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणणार

– नवीन मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना : राज्य आणि जिल्हा योजनांचे एकत्रिकरण करुन पशुधनात स्वयंपूर्णता, रोजगारनिर्मिती. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त गो-पालक, कुक्कुटपालक व शेळीपालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम

– मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना : प्रतिवर्षी १२४० कोटी रुपये देणार, २०,५९४ मासेमारांना लाभ

– मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार, यंदा सुमारे २०,००० कोटींची तरतूद, फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३२,७५६ कोटी रुपये दिले

– मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० : १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट, यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा, डिसेंबर २०२६ पर्यंत १० हजार मे.वॅ. क्षमता स्थापित होणार, सध्या ३३४९ मे.वॅ. क्षमता स्थापित

– मागेल त्याला सौर कृषीपंप : आतापर्यंत ६,६३,३२४ सौर कृषीपंप दिले, अंमलबजावणीत महाराष्ट्र नंबर १

– स्व. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश

सिंचन/पाणी

– २०४७ ची गरज लक्षात घेता ग्रामीण भागात दरडोई प्रतिदिन ५५ लिटर आणि शहरी भागात दरडोई १३५ लिटर पाण्याच्या उपलब्धतेचे लक्ष्य.

– जलसंपत्तीची डिजिटल, प्रमाणित आणि ऑनलाईन माहिती प्राप्त करण्यासाठी नाशिक येथे राज्य जल माहिती केंद्र. यासाठी ७१.२० कोटी रुपये

– कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने २२४० कोटींचा प्रकल्प, कृष्णा खोर्यातील पुराचे पाणी भिमा खोर्यातील पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवणार

– वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प : ९४,९६८ कोटी

– वैतरणा व उल्हास खोर्यातील ५४ टीएमसी पाणी गोदावरीत वळवणार, डीपीआर कार्यवाही सुरु

– दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प : १३,४९७ कोटी



– नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प : ७४६५ कोटी

– दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प : २२१३ कोटी

– बारामती-पुरंदर तालुक्यातील अवर्षणप्रवण क्षेत्राला पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी निरा-कर्हा नदीजोड प्रकल्प राबविणार

– २०२६ मध्ये अल-निनोचा संभाव्य धोका तसेच मान्सूनवर विपरित परिणामाची, दुष्काळाची शक्यता लक्षात घेता पिण्याचे पाणी राखून ठेवणार, जलयुक्त शिवार, जलसंधारण योजना राबवणार. वैरण विकास उपाययोजना राबविणार.

– जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यातील शहरांमध्ये ५८६० कोटींचा महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पुनर्वापर प्रकल्प राबविणार. नागरी सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया आणि प्रभावी पुनर्वापर करणार

महिला

– मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी भरीव तरतूद

– अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार.

– एकल महिला धोरण : सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणणार.

– लखपती दिदी : राज्यात २७ लाख लखपती दिदी झाल्या, २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दिदी करणार.

– महिला बचतगटांच्या वस्तु उत्पादन, विक्रीसाठी १३ जिल्ह्यात उमेद मॉल

युवा-शिक्षण-क्रीडा

– एज्युसिटी : नवी मुंबईत ६ देशांचे विद्यापीठ, सर्व विद्यापीठे याचवर्षी सुरु होणार, याच धर्तीवर ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करणार

– विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी : इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी या योजनेतून

– महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड ॲडव्हान्समेंट (महिमा) या संस्थेची स्थापना : परदेशी नोकर्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन

– समुपदेशन सेवा विस्तार आणि अधिक संघटित व्यवस्थेसाठी ३६ नवदिशा केंद्र स्थापन करणार

– स्टार्टअप, युनिकॉर्नमध्ये महाराष्ट्र नंबर १, पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक घडवणार, ५० हजार स्टार्टअपला बळ देणार

– मुख्यमंत्री उद्योजकता महाफंडमधून स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत, सर्वोत्तम ५० स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण प्रकल्प शासनात राबविण्यासाठी २५ लाखांपर्यंतच्या शासकीय कामाचे थेट वर्कऑर्डर्स

– मिशन लक्ष्यवेध : ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शुटिंग, रोईंग, सेलिंग, लॉनटेनिस, टेबल टेनिस या १२ खेळांचे राज्य स्तरावर ८ हायपरफॉर्मन्स सेंटर्स सुरु, आता आणखी ४ केंद्र सुरु करणार

– विभागीय स्तरावर २५ क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हा स्तरावर ९६ क्रीडा गुणवत्ता विकास केंद्र सुरु करणार, यासाठी निधीची तरतूद

वारसा/संस्कृती

– छत्रपती शिवाजी महाराजांच्या युनेस्को यादीतील १२ किल्ल्यांच्या वारसा जतन करण्यासाठी उपाययोजना

– पुणे जिल्ह्यातील आंबेगाव शिवसृष्टी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ला परिसर विकासासाठी निधी देणार

– छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथील स्मारक आणि पानिपत, हरियाणा येथील काला अंब येथील मराठा शौर्य स्मारकासाठी सहाय्य

– सातारा जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा वासोटा किल्ला: मुनावळे ते वासोटे किल्ला रोपवे प्रकल्प हाती घेणार

– छत्रपती संभाजी महाराजांच्या मौजे तुळापूर स्मारकाचे काम जून २०२६ पर्यंत, मौजे वढू बुद्रूक समाधीस्थळाचे काम जून २०२७ पर्यंत पूर्णत्त्वाचे नियोजन, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर स्मारकाचा नियोजन आराखडा अंतिम टप्प्यात, निधी देणार

– सातारा जिल्ह्यातील अजिंक्यतारा किल्ला आणि संगम माहुली येथील महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचे जतन, संवर्धन, जिर्णोद्धार करणार

– महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती: ११ एप्रिल २०२६

एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवणार, त्यासाठी निधी देणार.

– महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार

– ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र

– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार स्थळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा करणार.

– संत गाडगेबाबा यांचे १५० वे जयंतीवर्ष

त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करणार.

राज्यस्तरिय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविणार. ७५ गावांत एआयच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार.

– महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिंचे विशेष वर्ष म्हणून २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार.

(क्रमशः)

# काही उन्हातले-काही वणव्यातले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पैसा खिशात शोभतो पण माणुसकी हृदयात..!!

जेव्हा दबलेले अनावर हुंदके उरामधे समावत नाहीत,

विद्रोही वृक्षाची धारधार मुळे कुण्या कुंडीत मावत नाहीत,

तेव्हा उद्रेकाने रानभरी होतात शब्द माझ्या लेखनीतीतले

काही उन्हातले-काही वणव्यातले

या कविवर्य अविनाश बनसोडे यांच्या ओळी खरंच शोभनीय आहेत त्या म्हणजे एक हुशार,दिलखुलास, शांत,संयमी, अभ्यासू व्यक्तिमत्व उमरगा तालुक्याचे नूतन पंचायत समिती सदस्य आदरणीय राजकुमार माने यांना जनतेमध्ये राजू या टोपण नावाने ओळखीचे असलेले माने साहेब साहेबाविषयी कितीही लिहिल अन् बोललं तरी शब्द अपुरे पडतात.

कारण त्याचं निस्वार्थी कार्य खरोखरच अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे.

अतिशय कष्टाने अन् प्रामाणिक राहून संघर्ष करत त्यांनी हा मान,सन्मान मिळवला आहे.

म्हणतात ना की इज्जत,आदर या गोष्टी मागून मिळत नाहीत तर त्या कमवाव्या लागतात तेच त्यांनी आपल्या प्रामाणिक कामातून केले आहे. कधी अपयश आलं तर खचून न जाता कोशिश करने वालो की कभी हार नहीं होती हा विचार आत्मसात करून त्यांनी आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

आणि समाजकारण करता करता जनतेच्या भरभरून असलेल्या प्रेमापोटी त्यांनी राजकारणात उडी घेतली.

सामाजिक बांधिलकी जपत आपण सर्वांच्या गळ्यातील ताईत आहोत, जनता आपल्यालाप्रतिसाद देत आहे,याचा गर्व न करता अडचणीत असलेल्या कोणत्याही गरजूंना सहकार्य करण्याची भावना आजही त्यांच्या मनामध्ये कायम आहे.

यांच्याकडून खरोखरच खूप प्रेरणा घेण्यासारखी आहे. फिनिक्स पक्षाच्या बरोबरीच हे मानवता हिच जात अन् माणुसकी हाच धर्म अशी भावना आपल्या मनामध्ये ठेऊन जीवन जगणार हे आदर्श व्यक्तिमत्व कोणाच्याही नजरेत भरेल असा राजबिंडा देह आहे.उन्हाळ्याच्या दिवसातच नव्हे तर ज्या ज्या वेळी आलूर व परिसरातील जनतेला पाण्यासाठी भटकंती करावी लागत असे त्या त्या वेळी त्यांनी शासनाच्या योजनेची वाट न पाहता स्वखर्चाने पाण्याचा टँकर गावोगावी फिरवून अनेकांची तहान भागवली आहे. डिझेल व पेट्रोल घेण्यासाठी जवळपास तीस ते चाळीस किलोमीटर प्रवास करावा लागत आहे हे ओळखून त्यांनी आलूर येथे पेट्रोल पंप उभे केले अन् ही एक मेजर समस्या दूर केली. या सर्व प्रामाणिक कामामुळेच आलूर ग्रामपंचायतच्या सदस्य ते सरपंच, उपसरपंच, मुरूम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अन् आताच झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून आलूर गणातून ३८०२ मते मिळवत तब्बल १४३७ मताधिक्याने त्यांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

अस म्हणतात एखाद्या मोठ्या वृक्षाखाली लहान वृक्ष मूळ धरत नाही पण राजकुमार माने हे अपवाद ठरतात कारण मुरूम नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आदरणीय बापूराव (काका) पाटील व राज्याचे माजी ग्रामीण विकास राज्यमंत्री बसवराज पाटील साहेब या दोन मोठ्या वृक्षाच्या आधाराने हे ही वृक्ष मूळ धरून वटवृक्ष बनत आहे.

गोरगरीब विद्यार्थी असतील तर त्यांच्या शैक्षणिक अडचणीस त्यांनी कधीही टाळाटाळ केली नाही. दवाखान्याची समस्या असेल त्याची वेळी गरजूंना त्यांनी छातीशी धरून सहाय्य केलं आहे.ते नेहमी म्हणतात की अडचणीच्या वेळेत उपयोगी ठरत नसेल तर तो पैसा अन् ती माणुसकी तरी काय कामाची.



त्यांचा बोलण्याचा उद्देश नेहमी हाच राहिला आहे.

पैसा खिशात शोभतो पण माणुसकी हृदयात

अशा या कर्तृत्ववान व्यक्तिमत्वास आगामी कार्यास शुभेच्छा

**– लेखक-जय गायकवाड**
**संपर्क-८४५९२५०१३८**

# सोलापूरची संघर्षनायिका ज्योतीताईंचा आवाज संसदेत घुमणार ...!

## ज्ञानाची ज्योत आता दिल्लीच्या तख्तावर.....!!; सोलापूरचा अभिमान देशभर दुमदुमणार.. ! नवा इतिहास घडणार..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्राध्यापक डॉक्टर ज्योतीताई वाघमारे... बस नाम ही काफी है.... सोलापूरची कन्या..... संघर्षाचे दुसरे नाव म्हणजे ज्योतीताई..... अभ्यासू नेतृत्व म्हणजे ज्योतीताई.... महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ म्हणजे ज्योतीताई..... सामान्य जनतेला न्याय देणारे नेतृत्व म्हणजे ज्योतीताई..... अडचणींना धाऊन जाणाऱ्या भगिनी म्हणजे ज्योतीताई.... या महाराष्ट्राची लाडकी बहीण म्हणजे ज्योतीताई..... ज्योतीताई भारतीय संसदेतील वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेवर खासदार म्हणून जात आहेत.... उपमुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे साहेब यांनी त्यांची सार्थ निवड केली आहे... अवघ्या महाराष्ट्राला अभिमान वाटावा आणि गर्व वाटावा अशी ही निवड आहे.... सोलापूरची संघर्षशील कन्या ज्योतीताईंचा आवाज संसदेत घुमणार आहे... संघर्षाची ज्योत आता दिल्लीच्या तख्तावर झळकणार आहे....सोलापूरचा अभिमान देशभर दुमदुमणार ..... ताई तुमचे हार्दिक अभिनंदन....!!!

पत्र्याची खोली अन् गरिबीतील बालपण... संघर्ष आणि शिक्षणाच्या जोरावर आता राज्यसभेची खासदारकी मिळाली आहे...संघर्षाची ज्योत दिल्लीच्या तख्तावर जात आहे! रस्त्याच्या दिव्याखाली अभ्यास करणारी मुलगी आता संसदेत विचार व्यक्त करणार आहे.

सोलापूरच्या मातीतून उभी राहिलेली संघर्षाची ज्योत आता थेट दिल्लीच्या तख्तावर पोहोचत आहे. शिवसेनेच्या राज्य प्रवक्ता प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांना राज्यसभेसाठी उमेदवारी जाहीर होणे ही केवळ वैयक्तिक यशाची कथा नाही, तर संघर्ष, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या शक्तीचा सन्मान आहे.



गरिबीतून, पत्र्याच्या छोट्याशा खोलीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज संसद भवनापर्यंत पोहोचत आहे. वेटर वडिलांच्या कष्टातून उभ्या राहिलेल्या या ताईने शिक्षण, अभ्यास आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सामाजिक कार्य, सामाजिक चळवळ, प्रसार माध्यमातील योगदान, आंबेडकरी विचारांचा वारसा, समाजप्रबोधनाची तळमळ आणि अन्यायाविरुद्ध आक्रमकपणे आवाज उठवण्याची त्यांची शैली यामुळे त्या राज्याच्या राजकारणात प्रभावीपणे पुढे आल्या. महाराष्ट्रभर त्यांची मुलुख मैदानी तोफ धडाडली...

शिवसेना प्रमुखांच्या विचार नेतृत्वावर विश्वास ठेवत त्यांनी पक्षाची भूमिका उभ्या महाराष्ट्रात ठामपणे मांडली आणि आज त्याच कर्तृत्वाची दखल घेत त्यांना राज्यसभेसाठी संधी देण्यात आली आहे. सोलापूरसारख्या शहरासाठी ही अभिमानाची बाब आहे की, येथील एका संघर्षशील मुलीला आता देशाच्या सर्वोच्च संसदेत काम करण्याची संधी मिळत आहे. प्रा. ज्योती वाघमारे यांचा हा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे. त्यांच्या या नव्या वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..! दिल्लीच्या संसदेतूनही त्या समाजाच्या प्रश्नांसाठी तितक्याच ताकदीने आवाज उठवतील, असा विश्वास आहे. ताई, आम्हा सर्वांना तुमचा सार्थ अभिमान आहे. आपल्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा....! अभिनंदन....!!!

**-- पत्रकार किरण बनसोडे**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# देवाचे नामस्मरण करणे, हाच ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे : ह. भ. प. किसन महाराज जगताप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : देव काही लांब नाही, तो तुमच्या भावात आहे. शुद्ध अंतःकरणाने आणि प्रेमाने देवाचे नामस्मरण करणे, हाच ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. किसन महाराज जगताप (वलांडीकर) यांनी केले. सुपतगाव ता. उमरगा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या भावे गावे गीत, शुद्ध करुनिया चित्त । तुज व्हावा आहे देव, तरी हा सुलभ उपावं ।। या प्रसिद्ध अभंगावर त्यांनी निरूपण केले.

कीर्तनातील मुख्य विचार

महाराजांनी आपल्या ओघवत्या भाषेत या अभंगाचा अर्थ उलगडून सांगितला. कीर्तनाचे काही ठळक मुद्दे खालीलप्रमाणे राहिले:

भावाची महती: देव हा बाजारात विकत मिळत नाही किंवा तो हिमालयात जाऊनच भेटतो असे नाही. ज्याचे अंतःकरण शुद्ध आहे आणि ज्याच्याकडे अनन्य भाव आहे, तिथे देव स्वतःहून प्रकट होतो.

सुलभ उपाय: कलियुगात भगवंताला प्राप्त करण्यासाठी कठीण तपश्चर्येची गरज नाही. केवळ नामस्मरण आणि कीर्तन ही भक्तीची सुलभ साधने संतांनी आपल्याला दिली आहेत.

चित्तशुद्धीचा आग्रह: मनात कपट ठेवून केलेली भक्ती फळाला येत नाही. चित्त शुद्ध असेल तरच गायलेले गीत (भजन) भगवंतापर्यंत पोहोचते.

**भक्तांची मांदियाळी**

सुपतगाव येथील या सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांनी हजेरी लावली होती. टाळ-मृदंगाचा गजर आणि 'विठ्ठल विठ्ठल' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. महाराजांच्या विनोदी पण मार्मिक शैलीतील उदाहरणांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

# पंढरपूर एमआयडीसी चा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा : उद्योगमंत्री उदय सामंत

## मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आ. समाधान आवताडे यांचा पाठपुरावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंढरपूर एमआयडीसी मार्गी लागण्याकरिता माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी यापूर्वीच सूचना केल्या आहेत. पंढरपूर एमआयडीसीच्या बाबतीत लवकरात लवकर मार्गी लावण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांनी मर्यादित वेळेत हा विषय सोडवा, अशा सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर एमआयडीसीच्या संदर्भात विधान भवन मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान उद्योग मंत्री उदय सामंत त्यांच्याकडे पाठपुरावा करण्याकरिता बैठकीत केलेला पाठपुरावा आणि वस्तुस्थिती मांडली.

आमदार समाधान आवताडे साहेबांचा पंढरपूर चखऊ (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) संदर्भात सातत्याने आणि पाठपुरावा केला आहे. हा प्रश्न तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित होता, ज्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी ते प्रयत्नशील आहेत.



आमदार समाधान आवताडे यांनी उद्योग मंत्रालय, चखऊ अधिकार्यांशी सातत्याने संपर्क साधून, बैठका घेऊन आणि अखंड पाठपुरावा करून कासेगाव (ता. पंढरपूर) येथे चखऊ साठी यापूर्वी मंजुरी मिळवली आहे. यामध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये उद्योग मंत्रालयाने ५४ एकर जमीन 'औद्योगिक क्षेत्र' म्हणून घोषित केली. याबाबत अध्यादेश काढण्यात आला, ज्यामुळे चखऊ उभारणीला गती मिळाली.

दरम्यान, अर्थसंकल्प अधिवेशनात झालेल्या बैठकीत पंढरपूर एमआयडीसी हा विषय मार्गी लावण्याचे आदेश उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. यावेळी एमआयडीसीचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# बार्टीमुळेच यूपीएससी उत्तीर्ण होऊ शकलो : राहुल कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेने मला दिलेल्या शिष्यवृत्तीमुळेच माझ्यासारखा सामान्य कुटुंबातील मुलगा यूपीएसी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन भारत सरकारच्या सहाय्यक संचालक सुक्षम लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयात अधिकारी म्हणून रुजू झाला. अशा भावना बार्टीची शिष्यवृत्ती घेतलेल्या एका विद्यार्थ्याने व्यक्त केल्या.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेतील संशोधक विद्यार्थी राहुल कांबळे यांनी दिनांक ४ मार्च २०२६ रोजी बार्टी संस्थेला भेट दिली. यावेळी त्यांचा विभागप्रमुख रविंद्र कदम, डॉ बबन जोगदंड, शुभांगी पाटील, लेखाधिकारी नितिन चव्हाण यांच्या हस्ते भारताचे संविधान, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ जोगदंड म्हणाले की, बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षेत बार्टीचे विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना दर्जेदार व नाविन्यपूर्ण प्रशिक्षण देण्यात येत आहे. बार्टीचे युपीएसी उर्तीण विद्यार्थी राहुल कांबळे यांनी पीएचडी करत असताना स्पर्धा परीक्षेचाही अभ्यास केला.त्यांत त्यांनी यश मिळवले.बार्टीच्या अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व नागरी सेवेत अधिकारी म्हणून बार्टीचा नावलौकिक मिळविला आहे. विद्यार्थ्यांनी अधिकारी झाल्याच्यानंतर बार्टीकडे आणि आपल्या विद्यार्थ्याकडे लक्ष देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे,असे आवाहान करुन बार्टी संस्थेच्या वतीने त्यांनी अभिनंदन केले.

सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, डॉ अंकुश गायकवाड, विकास गायकवाड, धिरज खाडे, अमिर मुलानी, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचलन विकास गायकवाड यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

# बार्टी संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी मुख्य परीक्षा (UPSC Engineering - Mains Examination) या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. ५०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी संघ लोकसेवा आयोगाने भारतीय अभियांत्रिकी पूर्व परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार भारतीय अभियांत्रिकी सेवा (चरळपी एुराळपरींळेप) पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. ५०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICE BORD > UPSC Engineering Service - Mains Examination 2026 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी.

# विश्वास नांगरे पाटील-अप्पर महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या हस्ते संतोष बाळु कदम यांचा सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : माझी स्वप्नपूर्ती पोलिस अधिकारी संभाजीराव जगन्नाथ पाटणकर लिखित पुस्तक प्रकाशन प्रसंगी विश्वास नांगरे पाटील - अप्पर महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या हस्ते संतोष बाळु कदम यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित मान्यवर अमोल शिंदे(उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे खाजगी सचिव)तसेच इसाक बागवान माजी सहाय्यक पोलीस आयुक्त एन्काऊंटर स्पेशालिस्ट, स्वामी ओंकारानंद महाराज, शिवाजीराव जगन्नाथ पाटणकर बृहन्मुंबई पोलीस सोसायटी मा.खजिनदार, प्रतिक शिवाजीराव पाटणकर व शासकीय अध्यात्मिक मान्यवर या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला उपस्थित होते.

# मुरलीधर मंदिर नियोजीत भक्तनिवास बांधकाम प्रथम देणगीदार माधुरी व अनिलकुमार कुलकर्णी यांचा चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत मुरलीधर मंदीर नियोजीत भक्त निवास बांधकाम साठी प्रथम देणगीदाराचा मान कोल्हापूर निवासी स्वामी भक्त माधुरी कुलकर्णी व अनिलकुमार कुलकर्णी यांना लाभला आहे. यानिमीत्ताने श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने समितीचे



चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी देणगीदार माधुरी कुलकर्णी व अनिलकुमार कुलकर्णी यांचा श्री.स्वामी समर्थाचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांची मारापूरमध्ये 'ऊर्जा व्यवस्थापन आणि संवर्धन जनजागृती' या विषयावर रॅली संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मारापूर (ता. पंढरपूर) मध्ये गोपाळपूर येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या मेसा अर्थात मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने 'ऊर्जा व्यवस्थापन आणि संवर्धन जनजागृती' या विषयावर भव्य रॅलीचे आयोजन केले होते. या उपक्रमाला मारापूरच्या ग्रामस्थांकडून मोठा प्रतिसाद मिळाला.




स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली मारापूर मध्ये या भव्य रॅलीचे आयोजन केले होते. मारापूरचे सरपंच व नूतन पंचायत समिती सदस्य विनायकराव यादव, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब यादव, उपसरपंच अशोक आसबे, दामाजी शुगरचे माजी संचालक भुजंगराव यादव, डॉ. सत्यवान यादव, तुकाराम यादव, राजकुमार यादव, विठ्ठल आसबे, गजानन माने, नागनाथ आसबे यांच्यासह मारापूरचे इतर ग्रामस्थ उपस्थित होते. या रॅलीचे नियोजन प्रा. पोपट आसबे यांनी केले होते. या रॅलीच्या माध्यमातून 'ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापनाचे महत्त्व' हे ग्रामस्थांना माहित व्हावे या उद्देशाने ग्रामस्थांनी भविष्याचा विचार करून उर्जेची बचत करावी हा होता. यावेळी भव्य पोस्टर प्रदर्शन व घोषणाही देण्यात आल्या. या रॅलीद्वारे ग्रामस्थांमध्ये 'ऊर्जा व्यवस्थापन आणि संवर्धन जनजागृती' करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांचे विचार ऐकण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती. या रॅलीत स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या मेसा मधील जवळपास १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. समाजाच्या हितासाठी कार्य करणाऱ्या स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे या उपक्रमामुळे मारापूर व पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

## महापौर रितू तावडे यांच्याकडून देखील शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या कार्याचे कौतुक

# शिवभक्त संजय दादा भालेराव यांचे कौतुकास्पद पाऊल; सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासूनचे थकीत वीज बिल स्वखर्चाने भरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : प्रभाग क्रमांक १२६ मधील गोळीबार रोड येथील बाल मित्र मंडळ शिवकृपा चाळ येथील सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासूनचे थकित लाईट बिल ६ लाख ९२००० हजार रुपये होते.ही गोष्ट फक्त बिलाची नाही,तर आपल्या जबाबदारीची आहे.सार्वजनिक शौचालय हे गरीब,कामगार आणि प्रवासी बांधवांसाठी अत्यंत गरजेचे आहे. लाईट नसल्यामुळे त्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.ही अडचड दूर करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.या भावनेतूनच ही बाब शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या निदर्शनास येताच त्यांनी स्वतःला छत्रपती शिवाजी महाराजांचा एक मावळा समजून





शिवभक्त संजय दादा भालेराव यांनी ते थकित वीज बिल स्वखर्चातून भरले.

यावेळी शिवभक्त संजय दादा भालेराव म्हणाले की,महाराजांनी आपल्याला स्वराज्य दिले.न्याय दिला आणि सर्वसामान्य जनतेची सेवा कशी करावी हे शिकवले.जर मी स्वतःला शिवभक्त म्हणत असलो,तर मला सर्वप्रथम जनतेची सेवा करणेच आवश्यक आहे.जर मी छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा असूनही जनतेचे प्रश्न सोडवू शकत नसेन,तर मग मोठ्या थाटामाटात शिवजयंती साजरी करण्याचा मला काय अधिकार?शिवजयंती ही फक्त मिरवणूक काढण्याची किंवा घोषणा देण्याची गोष्ट नाही तर ती महाराजांच्या विचारांचे पालन करण्याची आणि त्यांच्या आदर्शांवर चालण्याची शपथ घेण्याची वेळ आहे.कारण जनतेची सेवा हीच खरी शिवभक्ती आहे असे ही यावेळी शिवभक्त संजय दादा भालेराव म्हणाले.

**महापौर रितू तावडे यांच्याकडून देखील शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या कार्याचे कौतुक**

आपल्या प्रभागातील नागरिक आणि त्यांच्या मूलभूत गरजांप्रती असलेली बांधिलकी काय असते,याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवभक्त श्री.संजय दादा भालेराव असून साईनाथ नगर रोड,शिवकृपा चाळ येथील सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासून थकीत असलेले ₹६,९२,८०४/- (सहा लाख ब्याण्णव हजार आठशे चार रुपये) चे वीज बिल संजय दादांनी स्वखर्चातून भरण्याचा जो निर्णय घेतला आहे,तो खरोखरच कौतुकास्पद आहे.समाजहित आणि जनसेवा हाच खरा धर्म मानून,प्रशासकीय अडथळ्यांवर मात करत त्यांनी दाखवलेली ही तत्परता वाखाणण्याजोगी आहे.अशा निस्वार्थी कार्यकर्त्यांमुळेच आपल्या परिसरातील प्रश्न मार्गी लागतात,असे यावेळी महापौर रितू तावडे यांनी म्हणत सर्व रहिवाशांच्या वतीने त्यांनी संजय दादांचे यावेळी मनःपूर्वक आभार मानले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रदिप लोंढे वेसनमुक्ती सेवा पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धाराशिव व समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धाराशिव व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या लेडीज क्लब धाराशिव येथे विधी सेवा महा शिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा या कार्यक्रमात व्यसनमुक्ती कार्यात सहभाग नोंदवलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात मोजे आंदोरा ता.कळंब येथील श्री. प्रदीप रामभाऊ लोंढे यांना माननीय न्यायमूर्ती श्री शैलेश जी ब्रह्मे ( उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ) व समाज कल्याण आयुक्त सचिनजी कवले डॉ.संदीप जी तांबारे यांच्या शुभ हस्ते व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सोलापूरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

## आमदार देवेंद्र कोठे यांचा पाठपुरावा : विद्यार्थ्यांमध्ये आनंदाची भावना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करावे असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला दिले आहेत, अशी माहिती आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली. सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय होण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

या निर्णयामुळे शासकीय पातळीवरील हालचालींना वेग आला असून आगामी शैक्षणिक वर्षात म्हणजेच येत्या जूनपासूनच सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोलापुरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रश्न गेल्या ६० वर्षांपासून प्रलंबित आहे. सोलापूरसाठी मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय इतर शहरात वळविण्यात आले. याबाबत मागणी केल्यानंतर तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रयत्न करून सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला मंजुरी मिळवून दिली. तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ३४ एकर जागेवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करता येईल. याकरिता २५० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून याच अर्थसंकल्पात त्याकरिता तरतूद करावी आणि येत्या जून महिन्यापासून हे महाविद्यालय सोलापूरात सुरू व्हावे अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी २५ फेब्रुवारी रोजी चालू अधिवेशनात केली होती. याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेटही घेतली होती.

त्यांच्या या मागणीला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना आदेश दिले आहेत. थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू व्हावे याकरिता पुढाकार घेतल्याने याबाबत शासकीय पातळीवरील हालचाली अधिक गतिमान झाल्या आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सोलापूर शहर जिल्ह्यातील विद्यार्थी समाज माध्यमांवर आनंद व्यक्त करत आहेत.

### उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील अधिवेशनानंतर जाणार दिल्लीला

**राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील अधिवेशनानंतर एआयसीटीई च्या मान्यतेसाठी स्वतः दिल्ली येथे जाणार आहेत. त्यामुळे सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याच्या तयारीच्या कामाला मोठी गती मिळणार आहे.**

### सोलापूरच्या उच्च शिक्षणाच्या प्रवासातील मैलाचा दगड

**तरुणांना सोलापुरातच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून अभियांत्रिकीचे शिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीला यश आले याचे समाधान आहे. याकामी उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होत आहे. शासनाच्या या निर्णयाचा सोलापूरकरांना मोठा फायदा होणार असून सोलापूरच्या उच्च शिक्षणाच्या प्रवासातील हा मैलाचा दगड ठरणार आहे.**

**– देवेंद्र कोठे, आमदार**



# पंचायत समिती तुळजापूरच्या सभापतीपदी विक्रम देशमुख तर उपसभापतीपदी रोहिणी मिलगिरे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील पंचायत समिती तुळजापूरच्या सभापती पदी काटी येथील भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा नूतन पंचायत समिती सदस्य विक्रम देशमुख यांची तर उप सभापती पदी सिंदगाव तालुका तुळजापूर येथील नूतन पंचायत समिती सदस्या सौ. रोहीणी विवेकानंद मिलगिरे यांची निवड करण्यात आली आहे.



नुकतच पार पडलेल्या तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या सदस्य निवडीच्या निवडणुकीत तुळजापूर पंचायत समितीवर भाजपाला निर्विवाद बहुमत मिळाले होते परंतु पंचायत समिती सभापती आणि उपसभापती च्या निवडीची उत्सुकता तुळजापूर तालुक्यातील तमाम जनतेला लागली होती. ती उत्सुकता आता संपली असून दि. ६ मार्च २०२६ रोजी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लाडके आमदार राणाजगजीतसिंह पाटील उर्फ राणा दादा व तुळजापूर तालुक्याचे युवा नेतृत्व सुनील चव्हाण मालक यांच्या प्रमुख उपस्थितीत तुळजापूर पंचायत समिती सभापती आणि उपसभापती पदाची निवड प्रक्रिया पार पडली असून तुळजापूर पंचायत समिती सभापती पदी काटी पंचायत समिती गणातून विजयी झालेले भाजपाचे विक्रम देशमुख यांची निवड करण्यात आली असून पंचायत समिती नंदगाव गणातून विजयी झालेल्या सौ.रोहिणीताई विवेकानंद मिलगिरे यांची उप सभापती पदी निवड जाहीर करण्यात आलीआहे.

त्यांच्या या सार्थ निवडी बद्दल तुळजापूर तालुक्यातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला असून नूतन सभापती व उपसभापती यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# तुकाराम महाराज बीज उत्सव श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : संतश्रेष्ठ जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांच्या बीज दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी पहाटेपासूनच मंदिर परिसरात हरिनामाचा गजर, अभंग गीते व भजन–कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस दर्शन घेतले तसेच संत तुकाराम महाराजांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक वंदन केले.

मंदिरात विशेष पूजा व आरती करण्यात आली. संत तुकाराम महाराजांनी दिलेल्या हरिनामाच्या संदेशाचे स्मरण करून भाविकांनी गाथा, अभंग व हरिनाम संकीर्तनाद्वारे भक्तिभाव व्यक्त केला.

या उत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने सर्व व्यवस्था सुरळीत ठेवण्यात आली होती.

# हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांना मिळणार बक्षीस; चळे जि.प. शाळेत होणार ७ मार्च रोजी महिलांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चळे/प्रतिनिधी : मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी भाषा गौरव दिन, कुसुमाग्रज तथा वि वा शिरवाडकर यांची जयंती जागतिक मातृभाषा दिन या निमित्ताने सिद्धनाथ सार्वजनिक मुक्त वाचनालयाच्या संयोजनातून व जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा चळे यांच्या सहभागातून घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**चळे येथे महिलांसाठी ७ मार्च रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन; मान्यवरांची उपस्थिती**

इयत्ता पहिली( तु- अ)अनिकेत कसबे, राजनंदिनी रणदिवे, राजवीर काळे ( तु- ब) ईश्वरी घाडगे , आनवी कांबळे, सई वाघमारे, इयत्ता दुसरी(तु - अ) आरसिया मुलानी, अर्णव कोळी, शिवानी गवते (तु- ब) मयुरी कांबळे, सुदर्शन गोवे, रुहाणी वाघमारे इयत्ता तिसरी- ( तु- अ) श्रेयश कुंभार रणवीर सटाले,सूर्या गायकवाड ( तु- ब) सई मोरे 'स्मित मोरे , कार्तिक घोडके, इयत्ता चौथी ( तु- अ) प्राजक्ता कदम संगमेश्वर मोरे, प्रज्ञा वाघ ( तु- ब) वैष्णवी कांबळे, वैष्णवी गवते, युवराज मोरे वरील सर्व विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय असे क्रमांक प्राप्त केले असून विजेत्यांना महिला दिनाच्या पूर्वसंध्येला प्रमाणपत्र व बक्षीस. सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार. त्याचबरोबर चळे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत महिला दिनानिमित्त सात मार्च रोजी विविध कलागुणांना भाव देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून महिलांसाठी विविध विषयावर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे प्रमुख अतिथी म्हणून सौ. तृप्ती खरे नूतन जिल्हा परिषद सदस्य दुर्गा अंकुशराव, पंचायत समिती सदस्य रंजना शिंदे, यांच्यासह उच्चशिक्षित महिला डॉक्टर वकील यांची उपस्थिती लाभणार आहे.

# मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : राज्य पातळीवर कार्यरत असलेल्या मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिक, विचारवंत, लेखक, सामाजिक व धार्मिक कार्यात सतत अग्रेसर असलेले सेवा निवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांची निवड संस्थापक अध्यक्ष तथा राज्य अध्यक्ष प्रा.अनंत लांडगे यांनी नुकतच केली आहे.

सेवानिवृतांचे प्रश्न सोडविणे व सामाजिक काम करणे हे कार्य ही संघटना करते असून या संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदाची निवड नुकतच जाहीर करण्यात आली असून फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील बुद्धी जिवी कार्यकर्ते विचारवंत साहित्य सेवा निवृत्त प्राचार्य कमलाकर कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. प्राचार्य कमलाकर कांबळे हे मूळचे तुगाव तालुका उमरगा येथील रहिवासी असून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण करून काही काळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली.त्यानंतर आंबेजोगाई येथील महाविद्यालयात ते प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाले.नोकरी करत-करत त्यानी आपल्या सामाजिक कार्याकडे कधी दुर्लक्ष केलं नाही.



सातत्याने काही ना काही उपक्रम ते आंबेजोगाई आणि तुगाव ता.उमरगा परिसरात राबवितात.दर वर्षी बौद्ध साहित्य परिषदेचे आयोजन करतात तर गेल्या दहा वर्षापासून ते आपल्या मूळ गावी तुगाव ता.उमरगा या ठिकाणी दर २५ डिसेंबरला बौद्ध धम्म परिषद घेतात.त्या अनुषंगाने समाज प्रबोधन व्याख्यान धम्म गुरु पूज्य भन्तेजी यांची धम्मदेशना ( प्रवचण) अशा प्रकरि विविध कार्यक्रमाचे आयोजन ते करतात.त्यांचा एकूनच कार्याची दखल घेवून मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या सार्थ निवडी बद्दल मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे मराठवाडा अध्यक्ष बलभीमराव कोथिंबीरे,लातूर जिल्हाध्यक्ष प्रा.एस.टी.मस्के, प्रा.विजय श्रगारे, माणिक पवार बी.बी.गायकवाड,मोहन कांबळे सेलूकर, प्रा.शंकर सोनवणे, विनायक बोरीकर, प्रा.देविदास शिंदे, एस.एस.धसवाडीकर, ए.बी.कांबळे, रमेश श्रगारे, रमेश हणमंते, अजय गोडबोले आदीनी प्राचार्य कमलाकर कांबळे यांचे अभिनंदन केले आहे.

**अभंगातून अंधश्रद्धेविरोधी संदेश; हरिपाठ, पालखी सोहळा व जागर भजनाने परिसर दुमदुमला**

# संत तुकाराम महाराज बीज सोहळा खालिंग बु. येथे उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील खालिंग बु., पडघा येथे दि. ५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम महाराज बीज सोहळा दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी ह.भ.प. सुभाष महाराज तरणे यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या अभंगांमधून समाजप्रबोधनाचा संदेश दिला. अभंगांद्वारे अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि सामाजिक विकृतींवर प्रहार करत समाज सुशिक्षित आणि विज्ञानवादी होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या प्रवचनाला उपस्थित वारकरी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सोहळ्यात हरिपाठ, पालखी सोहळा, नामवंत महाराजांचे कीर्तन तसेच जागर भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या कार्यक्रमास खालिंग ग्रामपंचायतीचे सरपंच राजाराम शेलार, राकेश शेलार, माजी सरपंच अशोक शेलार, माजी उपसरपंच भरत शेलार, संदिप शेलार, मोहन शेलार, अनंत शेलार तसेच पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील अनेक भाविक आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, समाजप्रबोधन आणि एकात्मतेचा संदेश देणारा हा बीज सोहळा खालिंग बु. परिसरात उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

# फुले शाहू आंबेडकर विचारांची लेक भिमराज की बेटी प्रा. ज्योती वाघमारे यांना शिवसेनेने केले खासदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महेश गायकवाड/सोलापूर : अत्यंत गरिबी, संघर्ष आणि चळवळीच्या वातावरणात वाढलेल्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे आता राज्यसभेची खासदार होणार आहे ही बातमी खरंच मोठी आनंददायी व तितकीच महत्वाची ही आहे.

चळवळीच्या रस्त्यावरून चालत, जाणारी , व्यासपीठांवरून बोलत, अन्यायाविरोधात शब्दांची तलवार उगारत सोलापुरातील लष्कर भागात वावरणारी ज्योती वाघमारे यांनी स्वतःची एक वेगळी आणि तितकीच मोठी ओळख लहानपणीच निर्माण केली होती. संघर्ष, जिद्द आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांच्या बळावर आज ज्योती संसदेकडे वाटचाल करत आहेत.

हा फक्त एका व्यक्तीचा प्रवास नाही हा संघर्ष करणाऱ्या प्रत्येक घराचा, प्रत्येक वंचित मुलीचा आणि चळवळीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा अभिमान आहे. रस्त्यावरच्या लढ्यांपासून संसदेतल्या आवाजापर्यंतचा हा प्रवास अनेकांना नवी प्रेरणा देणारा आहे.

प्रा. डॉ. ज्योती वाघमारे हिचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा. देताना त्यांच्या बद्धल नक्कीच भावना व्यक्त करणे आवश्यक आहे.

संसदेत अधिक जोमाने आणि ताकदीने घुमणार आहे. समाजातील वंचितांना न्याय मिळवून देण्याची त्यांची लढाई अधिक बळकट होणार आहे, सोलापूर च्या वालचंद कॉलेज मध्ये शिकत असलेली आमची लहान बहिण ज्योती ने सामान्य कुटुंबातून येऊन संसदेच्या सभागृहापर्यंत मारलेली ही झेप महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे. सहा भाषा अवगत असल्याने सोलापूरचा आणि महाराष्ट्राचा प्रश्न त्या दिल्लीत अधिक प्रभावीपणे मांडतील यात शंका नाही.

ज्योती तुम्हीतुमच्या कर्तृत्वाने तुम्ही यशाचे शिखर गाठले आहे, आता दिल्लीच्या तख्तावर सोलापूरच्या स्वाभिमानाची मोहोर उमटेल! ज्योती आमची लहान बहीण, आणि सोलापूरमधील आंबेडकरी चळवळीची लेक भीमराज की बेटी आहे . फुले शाहू आंबेडकर विचारांची असलेल्या सोलापूर च्या लेकीला शिवसेनेने राज्यसभेचे खासदार केले आहे .



फुले शाहू आंबेडकरी विचारांच्या ज्योती वाघमारे या सर्वात तरुण राज्यसभा खासदार असणार आहेत. ज्योती खासदार होणे म्हणजे सोलापूर साठी आनंदाची घटना ठरली आहे. फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील प्राध्यापिका ज्योती वाघमारे आंबेडकरी चळवळीचा बुलंद आवाज राज्यसभेत ठरणार आहे.

ज्योतीने हे यश स्वकर्तृवार मिळविले आहे. सन २०२४ ची लोकसभा २०२४ ची विधानसभा निवडणूक प्रचाराची जबाबदारी ज्योती वाघमारे यांनी सांभाळली होती. शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते पद सांभाळताना त्यांनी पक्षाची बाजू राज्यस्तरावर जोरदार लावून धरली होती. तेव्हापासून आंबेडकरी चळवळीतील प्रत्येक कार्यकर्ता ज्योती बद्दल आशा बाळगून होता. आणि ही आशा आता खरी ठरली आहे.